Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

| D |
|---|

# Paper-II
# SOCIOLOGY

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ........................................

(Name) ................................................

2. (Signature) ........................................

(Name) ................................................

Seat No. | | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ..............................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | | |

(To be filled by the Candidate)

# MAR - 14223

**Time Allowed : 2 Hours]** **[Maximum Marks : 200**

Number of Pages in this Booklet : **40** Number of Questions in this Booklet : **100**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **100** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper II will be compulsory.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   - (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   - (*ii*) Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.
   - (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. Use only Blue/Black Ball point pen.
11. Use of any calculator or log table, etc., is prohibited.
12. There is no negative marking for incorrect answers.

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परीक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 100 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनिटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   - (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्वीकारू नये.
   - (*ii*) पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
   - (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पाहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापि, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.
11. कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.
12. चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.

# Sociology
## Paper II
# समाजशास्त्र
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 120 Minutes]** **[Maximum Marks : 200**

**Note :** This Paper contains **Hundred (100)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण **शंभर (100)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Post-fordist organisation is characterised by :
(A) Standardization
(B) Greater flexibility
(C) Assembly line production
(D) Centralization of labour

2. Hypothesis formation is *not* a part of .................. .
(A) Survey
(B) Positivist research
(C) Steps in qualitative research
(D) Policy research

3. Which one of the following does *not* show commodification of rituals ?
(A) Mass Karva Chauth celebration
(B) Universal celebration of Sangeet Ceremony
(C) Private worship of god
(D) Jallikattu

1. उत्तर-फोर्डिस्ट संघटनेचे वैशिष्ट्य .............. आहे.
(A) प्रमाणीकरण
(B) अधिक लवचिकता
(C) क्रमिक जुळणी उत्पादन
(D) श्रमाचे केंद्रीकरण

2. गृहीतकसूत्रण हे .................. चा भाग **नाही**.
(A) सर्वेक्षण
(B) प्रत्यक्षवादी संशोधन
(C) गुणात्मक संशोधनातील पायऱ्या
(D) धोरणांविषयीचे संशोधन

3. खालीलपैकी कोणते विधींचे विनिमयवस्तुकरण **नाही** ?
(A) जनसमुदायाकडून करवा चौथ साजरे करणे
(B) संगीत समारंभ सार्वत्रिकपणे साजरा करणे
(C) देवाची पूजा खाजगीपणे करणे
(D) जलिकट्टू

4. Which of the following does *not* describe McDonaldization ?

(A) Efficiency

(B) Unpredictable

(C) Automated

(D) Calculability

5. Depeasantization refers to ............. .

(A) The declining of peasant practices

(B) The substitution of market rationality in agriculture

(C) Expulsion of small producers from the land

(D) Commercialization of agriculture

6. Which term is used by Karl Marx to describe the process by which the working class grows increasingly impoverished in relation to the capitalist class ?

(A) Precariat

(B) Pauperization

(C) Marginalisation

(D) Exploitation

4. खालीलपैकी कोणते मॅक्‌डोनल्डायझेशनचे वर्णन **नाही** ?

(A) कार्यक्षमता

(B) अप्राक्कथनीय

(C) स्वयंचलित

(D) गणना करण्याजोगे

5. निर्किसानीकरण म्हणजे ..................

(A) शेतीशी निगडित व्यवहार घटणे

(B) शेती-बाजाराच्या विवेकीकरणाचे पर्याय शोधणे

(C) लहान शेती उत्पादकांना जमिनीपासून दूर करणे

(D) शेतीचे व्यापारीकरण होणे

6. भांडवलवादी वर्गाच्या तुलनेत श्रमिक वर्गातील वाढत्या दुर्बलेच्या प्रक्रियेचे वर्णन करण्यासाठी कार्ल मार्क्स यांनी कोणती संज्ञा वापरली आहे ?

(A) अनिश्चित

(B) कंगालीकरण

(C) सीमांतीकरण

(D) शोषण

7. Who argues that any consideration of social facts without their value components is unreal ?
   (A) Radhakamal Mukerjee
   (B) G. S. Ghurye
   (C) Irawati Karve
   (D) M. N. Srinivas
8. Which of the following is *not* the characteristic of Disneyization ?
   (A) Theming
   (B) Hybrid consumption
   (C) Merchandising
   (D) Individual identity
9. What does Weber's concept of zweck-rational action involve ?
   (A) Means-end relationship
   (B) Habits of the actor
   (C) Only means
   (D) Emotions of the actor
10. The famous book, 'The Moral Economy of the Peasant : Rebellion and Subsistence in South-East Asia' is authored by .................... .
   (A) James C. Scott
   (B) Partha Chatterjee
   (C) D. N. Dhanagare
   (D) Andre Beteille

7. 'सामाजिक तथ्ये विचारात घेताना तथ्यांचे मूल्यात्मक घटक लक्षात न होणे हे अवास्तव आहे' असे कोणी प्रतिपादन केले ?
   (A) राधाकमल मुखर्जी
   (B) जी. एस. घुर्ये
   (C) इरावती कर्वे
   (D) एम्. एन्. श्रीनिवास
8. खालीलपैकी कोणते डिस्नेआयसेशनचे वैशिष्ट्य **नाही** ?
   (A) सूत्राधारित मांडणी
   (B) संकरित उपभोग
   (C) व्यापारीकरण
   (D) व्यक्तिगत ओळख
9. वेबर यांच्या ज्वेकरॅशनल या संकल्पनेमध्ये कशाचा समावेश होतो ?
   (A) साधन साध्य संबंध
   (B) कर्त्यांच्या सवयी
   (C) केवळ साधने
   (D) कर्त्याच्या भावना
10. ''द मॉरल इकॉनामी ऑफ द पिझंट : रेबीलीयन अॅण्ड सबसीसटन्स इन साऊथइस्ट एशिया'' या पुस्तकाचे लेखक कोण ?
   (A) जेम्स सी. स्कॉट
   (B) पार्थ चटर्जी
   (C) डी. एन. धनागरे
   (D) आंद्रे बेतेई

11. What term is used by Durkheim to understand "The totality of beliefs and sentiments common to average citizens of the same society forms a determinate system which has its own life" ?

(A) Division of labour

(B) Collective conscience

(C) Mechanical solidarity

(D) Organic solidarity

12. Match List I with List II and select the correct answer from the codes given below :

**List I (Author)**

(*a*) K. Marx

(*b*) E. Durkheim

(*c*) M. Weber

(*d*) T. Parsons

**List II (Book)**

(1) The Social System

(2) Economy and Society

(3) The Poverty of Philosophy

(4) The Division of Labour in Society

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (4) | (3) | (2) | (1) |
| (B) | (3) | (4) | (2) | (1) |
| (C) | (1) | (2) | (3) | (4) |
| (D) | (2) | (1) | (4) | (3) |

11. ''एकाच समाजातील सर्वसामान्य नागरिकांच्या विश्वास व भावनांचा समग्र ही एक अशी निर्धारक व्यवस्था आहे, जिचे एक स्वत:चे असे आयुष्य असते.'' त्याला डरखाईमने कोणती संज्ञा वापरली आहे ?

(A) श्रमविभागणी

(B) सामूहिक सद्सद्विवेक

(C) यांत्रिक ऐक्य

(D) जैविक ऐक्य

12. यादी I आणि यादी II जुळवा आणि खाली दिलेल्या सांकेतांकांमधून योग्य उत्तर निवडा :

**यादी I (लेखक)**

(*a*) के. मार्क्स

(*b*) ई. डरखाईम

(*c*) एम. वेबर

(*d*) टी. पार्सन्स

**यादी II (पुस्तक)**

(1) दी सोशल सिस्टिम

(2) इकॉनॉमी आणि सोयायटी

(3) दी पॉव्हर्टी ऑफ फिलॉसॉफी

(4) दी डिव्हिजन ऑफ लेबर इन सोयायटी

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (4) | (3) | (2) | (1) |
| (B) | (3) | (4) | (2) | (1) |
| (C) | (1) | (2) | (3) | (4) |
| (D) | (2) | (1) | (4) | (3) |

13. Who wrote the book 'Commodities and Capabilities' ?

(A) Amartya Sen

(B) M. N. Srinivas

(C) D. P. Mukerjee

(D) A. R. Desai

13. 'कमॉडीटीज ॲण्ड कॅपॅबिलीटिज' या पुस्तकाचे लेखक कोण ?

(A) अमर्त्य सेन

(B) एम्. एन्. श्रीनिवास

(C) डी. पी. मुखर्जी

(D) ए. आर्. देसाई

14. Which one is *not* the part of ecological infrastructure ?

(A) Soil

(B) Flora

(C) Building

(D) Fauna

14. खालीलपैकी कोणते परिस्थितीशास्त्रीय पायाभूत संरचनेचा भाग **नाही** ?

(A) माती

(B) वनस्पती

(C) इमारती

(D) प्राणी जगत

15. "Rules, social recipes, conceptions of appropriate conduct used as a frame of reference to act in social world" is called ................ .

(A) Life world

(B) Stock knowledge

(C) Role-taking

(D) Indexicality

15. ''सामाजिक जगात कृती करताना नियमने, सामाजिक रीत आणि उचित वर्तनविषयक संकल्पना याचा संदर्भ चौकट म्हणून वापर केला जातो'' यास ................ असे म्हणतात.

(A) जीवनविश्व

(B) ज्ञानसाठा

(C) भूमिका धारण करणे

(D) सूचीकरण

16. The emergence of creches for taking care of infants is the example of ...................... .

(A) Dysfunction

(B) Non-function

(C) Functional alternative

(D) Latent dysfunction

17. The Savage Mind is written by .............. .

(A) Karl Marx

(B) Claude Levi-Strauss

(C) Harold Garfinkel

(D) Clifford Geertz

18. C. W. Mills' concept of 'Power Elite' refers to a group of three elites ......................

(A) Economic, Political and Military

(B) Social, Economic and Political

(C) Social, Military and Political

(D) Social, Military and Economic

16. लहान मुलांची काळजी घेण्यासाठी पाळणाघरांचा झालेला उदय हे कशाचे उदाहरण आहे ?

(A) अपकार्य

(B) अकार्य

(C) कार्यात्मक पर्याय

(D) अप्रकट अपकार्य

17. दि सॅव्हेज माइंड, हे कोणी लिहिले आहे ?

(A) कार्ल मार्क्स

(B) क्लॉड लेव्ही-स्ट्रॉस

(C) हॅरॉल्ड गारफिंकेल

(D) क्लिफोर्ड गीर्टज्

18. सी. डब्ल्यू. मिल्स यांची 'पावर इलिट' ही संकल्पना तीन अभिजनांच्या समूहाविषयी सूचित करते ..................

(A) आर्थिक, राजकीय आणि सैनिकी

(B) सामाजिक, आर्थिक आणि राजकीय

(C) सामाजिक, सैनिकी आणि राजकीय

(D) सामाजिक, सैनिकी आणि आर्थिक

19. Which feminist perspective focuses upon the interconnectivity of patriarchy and capitalism ?
    (A) Liberal feminism
    (B) Socialist feminism
    (C) Radical feminism
    (D) Marxist feminism

20. 'Because motive' and 'In-order-to motive' refer to .................. .
    (A) Future and Present
    (B) Present and Future
    (C) Past and Future
    (D) Past and Present

21. Hyperreality refers to ............. .
    (A) Social experiences that are more than real
    (B) Social experiences that are unreal
    (C) Social experiences that are digital
    (D) Social experiences that are unbelievable

19. कोणता स्त्रीवादी दृष्टिकोन पुरुषप्रधानता व भांडवलशाहीतील आंतरसंबंधांवर लक्ष केंद्रित करतो ?
    (A) उदारमतवादी स्त्रीवाद
    (B) समाजवादी स्त्रीवाद
    (C) जहालमतवादी स्त्रीवाद
    (D) मार्क्सवादी स्त्रीवाद

20. 'कारण प्रेरणा' आणि 'च्यासाठी-प्रेरणा' .................. सूचित करतात.
    (A) भविष्य आणि वर्तमान
    (B) वर्तमान आणि भविष्य
    (C) भूतकाळ आणि भविष्य
    (D) भूतकाळ आणि वर्तमान

21. अतिवास्तव .................. हे सूचित करते.
    (A) वास्तवापेक्षा अधिक असणारे सामाजिक अनुभव
    (B) अवास्तव असे सामाजिक अनुभव
    (C) अंकीय सामाजिक अनुभव
    (D) अविश्वसनीय असे सामाजिक अनुभव

22. The personal laws governing people of different faiths in India do not include the matter of :

(A) Marriage

(B) Divorce

(C) Cohabitation

(D) Succession

23. Simulcra is .................

(A) Image without original

(B) Digital image

(C) Virtual image

(D) Similar image

24. When was the National Environment Awareness Campaign launched in India ?

(A) 1985

(B) 1986

(C) 1987

(D) 1988

25. Which of the following is *not* the structural feature of caste system in India ?

(A) Purity and Pollution

(B) Hierarchy

(C) Segmental Division

(D) Occupational Difference

22. भारतातील विविध धर्माच्या लोकांना नियंत्रित करणाऱ्या वैयक्तिक कायद्यांमध्ये ............... याचा समावेश होत नाही.

(A) विवाह

(B) घटस्फोट

(C) सहवास्तव्य

(D) वारसा

23. सिमुलक्रा हे .................. आहे.

(A) अस्सल नसलेली प्रतिमा

(B) अंकीय प्रतिमा

(C) आभासी प्रतिमा

(D) समान प्रतिमा

24. भारतात राष्ट्रीय पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणारी मोहीम केव्हा सुरू झाली ?

(A) 1985

(B) 1986

(C) 1987

(D) 1988

25. खालीलपैकी कोणते भारतीय जातीव्यवस्थेचे संरचनात्मक वैशिष्ट्य **नाही** ?

(A) शुद्धता आणि प्रदूषण

(B) श्रेणी रचना

(C) खंडात्मक विभागणी

(D) व्यावसायिक भेद

26. Dr. B. R. Ambedkar's solution for 'Annihilation of Caste' is ............. .
   (A) Reservation in Jobs
   (B) Intercaste Marriage
   (C) Legal Action
   (D) Social Reform

27. The function of the 'Kula-ring' among the Argonauts is :
   (A) Status enhancement and integration
   (B) Distribution of special goods in society
   (C) To satisfy primary needs of the members of society
   (D) To satisfy the need for redistribution

28. What defines the life world ?
   (A) The shared reality of everyday life
   (B) The life history of members of society
   (C) The world of norms, values and institutions of society
   (D) The social world of behaviour and activities

26. डॉ. बी. आर्. आंबेडकरांचा जातीच्या उच्छेदावरील उपाय .................. हे आहे.
   (A) नोकरीतील आरक्षण
   (B) आंतरजातीय विवाह
   (C) कायदेशीर कृती
   (D) सामाजिक सुधारणा

27. ऑर्गोनॉटस् मध्ये असणाऱ्या 'कुला-रिंग' चे कार्य म्हणजे :
   (A) दर्जाचे संवर्धन आणि एकात्मता
   (B) विशेष मालाचे समाजामधील वितरण
   (C) समाजातील सदस्यांच्या प्राथमिक गरजांची पूर्तता करणे
   (D) पुनर्वितरणाच्या गरजांची पूर्तता करणे

28. जीवनविश्व म्हणजे काय ?
   (A) दैनंदिन जीवनातील सामायिक वास्तव
   (B) समाजातील सदस्यांचा जीवन-इतिहास
   (C) समाजातील नियमने, मूल्ये आणि संस्थांचे विश्व
   (D) वर्तन आणि क्रियांचे सामाजिक विश्व

29. Which of the following statements appropriately explains Mannheim's idea of 'relationism' ?
    - (A) Knowledge and beliefs are the products of socio-political conditions
    - (B) Certain knowledge and beliefs are true only in certain times and places
    - (C) Certain knowledge and beliefs are true beyond time and space
    - (D) Knowledge and beliefs are class and nation determined

30. According to Durkheim in which societies we can observe contract law ?
    - (A) Industrial society
    - (B) Tribal society
    - (C) Rural society
    - (D) Small society

31. Which book is based on students' notes from a course taught by Mead ?
    - (A) Mind and Society
    - (B) Mind, Self and Society
    - (C) Presentation of Self in Everyday Life
    - (D) The Philosophy of the Present

29. खालीलपैकी कोणते विधान मॅनहाईम यांची संबंधवादाची कल्पना सुयोग्यपणे विशद करते ?
    - (A) ज्ञान आणि श्रद्धा यांची निर्मिती सामाजिक-राजकीय स्थितीतून होते
    - (B) विशिष्ट श्रद्धा आणि ज्ञान हे विशिष्ट काल आणि स्थळानुसार सत्य ठरतात
    - (C) स्थळ आणि काळापलीकडे विशिष्ट श्रद्धा आणि ज्ञान सत्य असते
    - (D) ज्ञान आणि श्रद्धा या वर्ग आणि राष्ट्रानुसार निर्धारित होतात

30. डरखाईम यांच्या मते करारात्मक कायदा आपण कोणत्या समाजांमध्ये पाहू शकतो ?
    - (A) औद्योगिक समाज
    - (B) आदिवासी समाज
    - (C) ग्रामीण समाज
    - (D) छोटे समाज

31. कोणते पुस्तक मीडने शिकवलेल्या अभ्यासक्रमावर विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या टिपणावर आधारलेले आहे ?
    - (A) माईंड ॲण्ड सोसायटी
    - (B) माईंड, सेल्फ ॲण्ड सोसायटी
    - (C) प्रेझेंटेशन ऑफ सेल्फ इन एव्हरीडे लाइफ
    - (D) दी फिलॉसॉफी ऑफ दी प्रेझंट

32. According to Bourdieu, which concept explains the 'Mental or Cognitive structure' through which people deal with the social world ?
    (A) Field
    (B) Cultural capital
    (C) Habitus
    (D) Agency

33. Who is associated with the concept of "urbanism as a way of life" ?
    (A) O. Lewis
    (B) L. Wirth
    (C) R. E. Park
    (D) H. Lefebvre

34. T. H. Marshall's idea of welfare on the basis of citizenship rights entails :
    (A) Civil rights and political rights
    (B) Political rights and social rights
    (C) Civil rights, political rights and social rights
    (D) Civil rights, political rights, social rights and economic rights

32. बूर्द्यू यांच्या मते 'सामाजिक जगाशी लोक ज्याद्वारे व्यवहार करतात अशा मानसिक व बोधनात्मक संरचना' विशद करणारी संकल्पना कोणती ?
    (A) क्षेत्र
    (B) सांस्कृतिक भांडवल
    (C) हॅबिटस
    (D) कर्तेपण

33. खालीलपैकी कोणाचे हे 'अर्बनीझम् ॲज अ वे ऑफ लाईफ'शी संबंधित आहे ?
    (A) ओ. लेव्हीस
    (B) एल्. व्हर्थ
    (C) आर्. ई. पार्क
    (D) एच्. लेफबर्व्हे

34. टी. एच्. मार्शल यांच्या नागरिकत्वाच्या हक्कांवर आधारित लोककल्याणाच्या कल्पनेत ............ अंतर्भूत आहे.
    (A) नागरी हक्क व राजकीय हक्क
    (B) राजकीय हक्क व सामाजिक हक्क
    (C) नागरी हक्क, राजकीय हक्क आणि सामाजिक हक्क
    (D) नागरी हक्क, राजकीय हक्क, सामाजिक हक्क आणि आर्थिक हक्क

35. The globe trotting elites experiencing food, clothing, aromas and spatial features of distant places is termed by Castells as ............... .

(A) Social spaces of Neoliberalism

(B) Spaces of flows

(C) Spaces of networks

(D) Floating spaces of elite

36. Castells refers to inequal access to digital networks as .................. .

(A) Digital divide

(B) Network divide

(C) I.T. Inequity

(D) Blackholes of marginality

37. In which year Domestic violence was recognized as a criminal offence in India ?

(A) 1975

(B) 1983

(C) 2005

(D) 2011

35. कास्टल्स यांनी जगभर सहज हिंडणाऱ्या अभिजनांनी दूरदेशीच्या अन्न, कपडे, सुवास व अवकाशात्मक वैशिष्ट्यांचा घेतलेल्या अनुभवाला ................... असे म्हटले आहे.

(A) नवउदारमतवादाचा सामाजिक अवकाश

(B) प्रवाहांचे अवकाश

(C) सजाल अवकाश

(D) अभिजनांचे तरंगते अवकाश

36. कास्टल्स अंकीय संजालाच्या विषम संधीला ................... असे म्हणतात.

(A) अंकीय विभागणी

(B) संजाल विभागणी

(C) माहिती तंत्रज्ञान विषम वाटप

(D) सीमांतीकरणाची कृष्णविवरे

37. भारतात कोणत्या वर्षी कौटुंबिक हिंसाचार दण्डनीय अपराध म्हणून गणला जाऊ लागला ?

(A) 1975

(B) 1983

(C) 2005

(D) 2011

38. Which concept is used by Habermas to refer to "the conditions under which social goals and values can be discussed on a rational and equalitarian basis to reach a consensus" ?

(A) Undistorted Communication

(B) Social Action

(C) Symbolic Interactionism

(D) Disenchantment

39. What does 'Archaeology' mean in Foucault's writings ?

(A) Speech

(B) Action

(C) Discourse

(D) Value

40. Hawthorne experiments in Industrial Sociology refer to ................ .

(A) Classical Management approach

(B) Human Relations approach

(C) Conflict approach

(D) Functional approach

38. ''अशी परिस्थिती ज्यात सामाजिक उद्दिष्टे व मूल्यांची चर्चा तार्किक व समान पायावर करून सहमतीपर्यंत पोचता येते'', यासाठी हाबरमासने कोणती संकल्पना वापरली आहे ?

(A) अविपर्यस्त संप्रेषण

(B) सामाजिक कृती

(C) प्रतिकात्मक आंतरक्रियावाद

(D) भ्रमनिरास

39. फूकोंच्या लिखाणातील 'पुरातत्त्वशास्त्र' याचा अर्थ काय ?

(A) भाषण

(B) कृती

(C) संभाषित

(D) मूल्य

40. औद्योगिक समाजशास्त्रातील हॉथॉर्न प्रयोग हे दर्शविते ................

(A) अभिजात व्यवस्थापन दृष्टिकोन

(B) मानवी संबंध दृष्टिकोन

(C) संघर्ष दृष्टिकोन

(D) कार्यात्मक दृष्टिकोन

41. Given below are two statements, one is labelled as Assertion (A) and the other as Reason (R) :

**Assertion (A) :** Family is a universal institution.

**Reason (R) :** It is expected to transfer sexual rights to the spouses in family.

Select the *correct* answer from the codes given below :

**Codes :**

(A) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) are true but (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true, but (R) is false

(D) (A) is false, but (R) is true

41. खाली दोन विधाने दिली आहेत. त्यातील एक प्रतिपादन (A) आहे आणि दुसरे कारण (R) आहे.

**प्रतिपादन (A) :** कुटुंब ही सार्वत्रिक संस्था आहे.

**कारण (R) :** जोडीदारांना लैंगिक अधिकार प्रदान करणे कुटुंबामध्ये अपेक्षित आहे.

खालील संकेतांकापैकी बरोबर उत्तर निवडा :

**संकेतांक :**

(A) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे

(B) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत, पण (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही

(C) (A) बरोबर आहे पण (R) चूक आहे

(D) (A) चूक आहे पण (R) बरोबर आहे

42. Which of the following gases protect us from harmful sun rays ?
   (A) Nitrogen
   (B) Ozone
   (C) Oxygen
   (D) Carbon dioxide

43. Which one of the following is *not* an indicator of Human Development Index ?
   (A) Life Expectancy
   (B) Education
   (C) Level of Urbanization
   (D) National Per Capita Income

44. Which view among the following is the oldest ?
   (A) Cyclical view of social change
   (B) Linear view of social change
   (C) Evolutionary model of social change
   (D) Dialectical model of social change

42. खालीलपैकी कोणता वायू 'घातक' सूर्य किरणां-पासून आपले संरक्षण करतो ?
   (A) नायट्रोजन
   (B) ओझोन
   (C) ऑक्सीजन
   (D) कार्बन डायऑक्साईड

43. खालीलपैकी कोणते मानवी विकास निर्देशांकाचे निदर्शक **नाही** ?
   (A) जीवनमानातील वाढ
   (B) शिक्षण
   (C) नागरीकरणाची पातळी
   (D) दरडोई राष्ट्रीय उत्पन्न

44. खालीलपैकी कोणता दृष्टिकोन सर्वात जुना आहे ?
   (A) सामाजिक परिवर्तनाचा चक्रीय दृष्टिकोन
   (B) सामाजिक परिवर्तनाचा रेषीय दृष्टिकोन
   (C) सामाजिक परिवर्तनाचे उत्क्रांतवादी प्रारूप
   (D) सामाजिक परिवर्तनाचे द्वंद्वात्मक प्रारूप

45. Most of the states in India have their distinct language. This is an example of :

(A) Social Stratification

(B) Social Difference

(C) Hierarchy

(D) Inequality

46. According to Max Weber 'class' as a dimension of economic power can be understood through :

(A) Control over mode of production

(B) Market situation and the life chances

(C) Possession of property

(D) Having a salaried job

47. Whose work on 'Stigma' led to emergence of disability studies ?

(A) A. Schutz

(B) G. H. Mead

(C) T. Parsons

(D) E. Goffman

45. भारतातील बहुतांश राज्यांची त्यांची वेगळी अशी भाषा आहे. हे कशाचे उदाहरण आहे ?

(A) सामाजिक स्तरीकरण

(B) सामाजिक भेद

(C) श्रेणीरचना

(D) विषमता

46. 'वर्ग' हे आर्थिक सत्तेचे परिमाण असून ते कशाच्या आधारे समजून घेता येते' असे वेबरचे मत आहे :

(A) उत्पादनाच्या पद्धतीवर नियंत्रण

(B) बाजारस्थिती आणि जीवनातील संधी

(C) संपत्तीची मालकी

(D) पगाराची नोकरी असणे

47. खालीलपैकी कोणाच्या 'कलंक' या संकल्पनेमुळे विकलांगता अध्ययनाच्या उदयास चालना मिळाली ?

(A) अल्फ्रेड शुट्स

(B) जी. एच. मीड

(C) टॉलकॉट पार्सन्स

(D) इर्विंग गॉफमॅन

48. As per census 2011, the number of disabled persons is the highest in which of the following age groups ?

(A) 10-19

(B) 20-29

(C) 30-39

(D) 40-49

49. Who introduced the concept of glocalization ?

(A) Ronald Robertson

(B) Martin Albrow

(C) Zygmunt Bauman

(D) Erik Swyngedouw

50. The only tribe which claims to be vegetarian is :

(A) Toda

(B) Gond

(C) Bhil

(D) Santhal

48. 2011 च्या जनगणनेनुसार खालीलपैकी कोणत्या वयोगटातील विकलांगांची संख्या सर्वात जास्त आहे ?

(A) 10-19

(B) 20-29

(C) 30-39

(D) 40-49

49. जागस्थानिकीकरण (Glocalization) या संकल्पनेची ओळख कुणी करून दिली ?

(A) रोनाल्ड रॉबर्टसन

(B) मार्टिन आल्ब्रो

(C) झिग्मंट बाऊमन

(D) एरिक स्वँगेडाऊ

50. खालीलपैकी कोणती आदिवासी जमात शाकाहारी असल्याचा दावा करते ?

(A) तोडा

(B) गोंड

(C) भिल

(D) संथाल

51. The communities that are engaged in Internet to carry on public discussions substantively with sufficient human feeling in the cyber-space is described as .................. .

(A) Cyber community

(B) Virtual community

(C) Epistemic community

(D) Temporal community

52. When agrarian stratification is discussed we generally refer to ........................ .

(A) Dominant caste

(B) Control over land

(C) Land alienation

(D) Rural poverty

51. सायबर अवकाशामध्ये जे समुदाय इंटरनेटच्या माध्यमातून मानवी जाणिवांसहित सार्वजनिकचर्या विश्वात सहभागी होतात, त्यांना .................. असे म्हणतात.

(A) सायबर समुदाय

(B) आभासी समुदाय

(C) ज्ञानाधारित समुदाय

(D) कालिक समुदाय

52. जेव्हा आपण कृषक स्तरीकरणाची चर्चा करतो, तेव्हा .................. चा संदर्भ घेत असतो.

(A) प्रभावी जात

(B) जमिनीवरील नियंत्रण

(C) जमिनीपासूनचे दूरीकरण

(D) ग्रामीण दारिद्र्य

53. Give below are two statements, one is labelled as Assertion (A) and other as Reason (R) :

**Assertion (A) :** Usually development projects lead to ecological degradation.

**Reason (R) :** India needs big development projects to become super power.

Select the *correct* answer from the codes given below :

**Codes :**

(A) Both (A) and (R) are correct and (R) is the correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) are correct, but (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true, but (R) is false

(D) (A) is false, but (R) is true

53. खाली दोन विधाने दिली आहेत. त्यातील एक प्रतिपादन (A) आहे आणि दुसरे कारण (R) आहे.

**प्रतिपादन (A) :** सर्वसाधारणपणे विकास प्रकल्पांचा परिणाम परिस्थितीशास्त्रीय ऱ्हासामध्ये होतो.

**कारण (R) :** महाशक्ती बनण्यासाठी भारताला मोठ्या विकास प्रकल्पांची गरज आहे.

खालील संकेतांकापैकी बरोबर उत्तर निवडा.

**संकेतांक :**

(A) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे

(B) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत, पण (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही

(C) (A) बरोबर आहे परंतु (R) हे चूक आहे

(D) (A) चूक आहे परंतु (R) हे बरोबर आहे

54. Habitus does not focus on our ways of ........................ .

(A) Acting

(B) Feeling

(C) Thinking

(D) Rejection of belief and values

55. Which theory of exchanges as a structuralist method of studying kinship relations is known as ?

(A) Alliance theory

(B) Group exchange theory

(C) Direct exchange theory

(D) Descent theory

56. Which one of the following statements about gender is *not* correct ?

(A) Is a normative disposition

(B) Is a cultural construct

(C) Is a natural disposition

(D) It helps understand inequalities

54. हॅबीटस आपल्या ........................ भर देत नाहीत.

(A) कृतींवर

(B) भावनेवर

(C) विचारांवर

(D) श्रद्धा व मूल्ये नाकारण्यावर

55. आप्तसंबंध अध्ययनाची संरचनावादी पद्धत म्हणून विनिमयाचा कोणता सिद्धांत ओळखला जातो ?

(A) युती सिद्धांत

(B) समूह विनिमय सिद्धांत

(C) प्रत्यक्ष विनिमय सिद्धांत

(D) वंश सिद्धांत

56. खालीलपैकी लिंगभावाच्या संदर्भातील कोणते विधान बरोबर **नाही** ?

(A) नियमनात्मक प्रवृत्ती आहे

(B) सांस्कृतिक रचित आहे

(C) नैसर्गिक प्रवृत्ती आहे

(D) विषमता जाणून घेण्याला मदत करते

57. Delay, before change in one part of society produces realignment of the other part is known as ................. .

(A) Cultural adjustment

(B) Acculturation

(C) Generation gap

(D) Cultural lag

58. Which of the following *cannot* be a hidden curriculum of education from the point of view of capitalist society ?

(A) A curriculum that produces subservient workforce

(B) That produces more integrated and rebellious workforce

(C) That produces passive and obedient workforce

(D) That encourages to accept authority without question

57. समाजाच्या एका घटकातील परिवर्तनातील विलंब हा समाजाच्या दुसऱ्या घटकातील पुनर्रेखन घडवते यास .................. म्हणून ओळखले जाते.

(A) सांस्कृतिक तडजोड

(B) समसंस्कृतीकरण

(C) पिढीतील अंतर

(D) सांस्कृतिक पश्चायन

58. भांडवली समाजाच्या दृष्टिकोनातून खालीलपैकी कोणता छुपा अभ्यासक्रम असू शकत **नाही** ?

(A) अभ्यासक्रम जो अत्याधिक आज्ञाकारी श्रमशक्ती निर्माण करतो

(B) अभ्यासक्रम जो अधिक एकात्मिक आणि विद्रोही श्रमशक्ती निर्माण करतो

(C) निष्क्रिय आणि आज्ञाधारी श्रमशक्ती निर्माण करतो

(D) अधिकाऱ्यास प्रश्न न विचारता स्थिती स्वीकारण्यास उत्तेजन देतो

59. What was the population of elderly (60+) in India as per census 2011 ?

(A) 6.4

(B) 6.7

(C) 7.5

(D) 8.0

60. Given below are two statements, one is labelled as Assertion (A) and the other as Reason (R).

**Assertion (A) :** Political sub-cultures are rarely homogeneous.

**Reason (R) :** There are significant differences among the politically conscious sections of society.

Select the correct answer from the codes given below :

**Codes :**

(A) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) are true, but (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true, but (R) is false

(D) (A) is false, but (R) is true

59. 2011 च्या जनगणनेनुसार भारतातील वयस्क (60+) लोकसंख्या किती होती ?

(A) 6.4

(B) 6.7

(C) 7.5

(D) 8.0

60. खाली दोन विधाने दिली आहेत. एक आहे प्रतिपादन (A) आणि दुसरे आहे कारण (R).

**प्रतिपादन (A) :** राजकीय उपसंस्कृती क्वचित एकजिनसी असतात.

**कारण (R) :** राजकीयदृष्ट्या जागरूक समाज–घटकांमध्ये महत्त्वपूर्ण मतभेद असतात.

खालील संकेतांकापैकी योग्य उत्तर निवडा :

**संकेतांक :**

(A) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे

(B) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत परंतु (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही

(C) (A) बरोबर आहे परंतु (R) हे चूक आहे

(D) (A) चूक आहे परंतु (R) हे बरोबर आहे

61. Who opines that "Laws are actually codified mores" ?

(A) E. Durkheim

(B) W. G. Sumner

(C) G. Arnold

(D) B. Malinowski

62. Which of the following states *does not* have water wetlands ?

(A) Punjab

(B) Gujarat

(C) Haryana

(D) Rajasthan

63. Who among the following held the view, "Marriage is rooted in the family rather than family in marriage" ?

(A) G. P. Murdock

(B) E. A. Westermarck

(C) C. Harris

(D) L. H. Morgan

64. 'Tharwad' is .................. .

(A) A kind of extended family

(B) A kinship usage

(C) A rule of residence

(D) A community

61. ''खरेतर कायदे हे सांकेतिक लोकनीती आहेत'', असे कोणाचे मत आहे ?

(A) ई. डरखाईम

(B) डब्लू. जी. सम्नर

(C) जी. अरनॉल्ड

(D) बी. मॅलीनोस्की

62. खालीलपैकी कोणत्या राज्यात पाणथळ जमिनी आढळत **नाहीत** ?

(A) पंजाब

(B) गुजरात

(C) हरियाणा

(D) राजस्थान

63. ''कुटुंबाची पाळेमुळे विवाहात नसून विवाहाची पाळेमुळे कुटुंबात असतात,'' असे खालीलपैकी कोणाचे मत आहे ?

(A) जी. पी. मरडॉक

(B) इ. ए. वेस्टरमार्क

(C) सी. हॅरीस

(D) एल. एच. मॉर्गन

64. 'थारवाड' हे ..................

(A) विस्तारित कुटुंबाचा प्रकार

(B) नातेसंबंधांचा व्यवहार

(C) वसतीस्थानासंबंधीचे नियम

(D) समुदाय

65. Customs are also called as ............ .

(A) Folkways

(B) Mores

(C) Laws

(D) Values

66. For Marx the mode of production refers to .................. .

(A) A combination of means of production and forces of production

(B) A combination of means of production and relations of productions

(C) The dynamics of relations of production only

(D) The dynamics of means of production only

67. When more and more individuals undermine marriage for procreation, their orientation to sexuality can be called ................ .

(A) Heteronormativity

(B) Same sex sexuality

(C) Hyper sexuality

(D) Plastic sexuality

65. परंपरांना हे सुद्धा म्हणतात ..................

(A) लोकरीती

(B) लोकनीती

(C) कायदे

(D) मूल्ये

66. मार्क्सच्या मतानुसार, उत्पादनपद्धती म्हणजे ......................

(A) उत्पादनाची साधने आणि उत्पादनाच्या शक्ती यांचे एकीकरण

(B) उत्पादनाची साधने आणि उत्पादनाचे संबंध यांचे एकीकरण

(C) केवळ उत्पादन संबंधामधील गतिशीलता

(D) केवळ उत्पादन साधनांमधील गतिशीलता

67. ज्यावेळी अधिकाधिक व्यक्ती पुनरुत्पादनासाठी विवाहाला कमी लेखतात, तेव्हा लैंगिकतेकडे पाहण्याच्या त्यांच्या दृष्टिकोनाला ................ हे म्हणतात.

(A) बहुनियमनात्मकता

(B) समलिंगी लैंगिकता

(C) अतिलैंगिकता

(D) प्लॅस्टीक लैंगिकता

68. Whose name is closely associated with the concept "Development Communication" ?

(A) Denis MacQuail

(B) Daniel Learner

(C) Robert Redfield

(D) Everett M. Rogers

69. Subculture refers to ................. .

(A) Ethnocentrism

(B) Homogeneity of values

(C) Counterculture

(D) Common lifestyle

70. Which one of the following is *not* the source of identity ?

(A) Ethnicity

(B) Attire

(C) Sexual orientation

(D) Class

68. 'विकास संज्ञापन' या संकल्पनेविषयी कोणाचे नाव संबंधित आहे ?

(A) डेनिस मॅक्वेल

(B) डॅनियल लर्नर

(C) रॉबर्ट रेडफील्ड

(D) एव्हरेट एम्. रॉजर्स

69. उपसंस्कृती म्हणजे ...................

(A) स्वसमूह श्रेष्ठतावाद

(B) मूल्यांमधील एकसंधता

(C) प्रतिसंस्कृती

(D) समान जीवन पद्धती

70. खालीलपैकी कोणता घटक अस्मितेचा स्रोत **नाही** ?

(A) वांशिकता

(B) पोषाख

(C) लैंगिक अभिमुखता

(D) वर्ग

71. "Power is intimately linked to knowledge." Who said this ?

(A) Bourdieu

(B) Giddens

(C) Foucault

(D) Beck

72. Agency reflects in .................. .

(A) A student challenging caste based discrimination in university

(B) A youth stealing money for drugs

(C) Daughter demanding dowry as her right

(D) Mother-in-law's power over her daughter-in-law

71. ''सत्ता ज्ञानाशी आत्मीय पद्धतीने जोडलेली असते.'' हे कोणी मांडले ?

(A) बुर्द्यू

(B) गिडन्स

(C) फुको

(D) बेक

72. कर्तेपण यातून प्रतिबिंबित होते ..................

(A) विद्यापीठातील जाती आधारित भेदभावाला आव्हान देणारा विद्यार्थी

(B) मादक पदार्थांसाठी पैसे चोरणारा तरुण मुलगा

(C) हक्क म्हणून हुंडा मागणारी मुलगी

(D) सासूची सुनेवरील सत्ता

73. Given below are two statements, one is labelled as Assertion (A) and the other as Reason (R).

**Assertion (A) :** Eviction of Slum dwellers forces them to live in precarious conditions.

**Reason (R) :** They are not properly rehabilitated after eviction.

Select the *correct* answer from the codes given below :

**Codes :**

(A) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) are true but (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true, but (R) is false

(D) (A) is false, but (R) is true

73. खाली दोन विधाने दिलेली आहेत, एकास प्रतिपादन (A) संबोधले आहे तर दुसऱ्यास कारण (R) संबोधले आहे.

**प्रतिपादन (A) :** झोपडपट्टी-वाशियांचे निष्कासन त्यांना अनिश्चित परिस्थितीत राहाण्यास भाग पाडते.

**कारण (R) :** निष्कासनांतर त्यांचे योग्य पद्धतीने पुनर्वसन केले जात नाही.

खाली दिलेल्या संकेतांकाच्या आधारे अचूक उत्तर निवडा :

**संकेतांक :**

(A) दोन्ही (A) आणि (R) हे बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण आहे

(B) दोन्ही (A) आणि (R) बरोबर आहेत परंतु (R) हे (A) चे बरोबर स्पष्टीकरण नाही

(C) (A) हे बरोबर आहे परंतु (R) हे चूक आहे

(D) (A) हे चूक आहे परंतु (R) हे बरोबर आहे

74. Every economy has three sectors. Which sector has witnessed marked growth in the last 25 years ?

(A) Primary

(B) Secondary

(C) Tertiary

(D) Welfare

75. What term is used to describe the gaps between the living conditions of some groups and those enjoyed by the majority of a population ?

(A) Enforced poverty

(B) Culture of poverty

(C) Relative poverty

(D) Absolute poverty

76. Who argued that the nature and dynamics of Indian agrarian economy can't be understood without connecting it to the imperialism ?

(A) H. Alavi and I. Banaji

(B) K. Marx and F. Engeles

(C) M. N. Srinivas

(D) A. Beteille

74. प्रत्येक अर्थव्यवस्थेत तीन क्षेत्रे असतात. गेल्या 25 वर्षात कोणत्या क्षेत्रात नोंद घेण्याजोगी वाढ झाली आहे ?

(A) प्राथमिक

(B) द्वितीयक

(C) तृतीयक

(D) लोककल्याण

75. काही समुदायांचे राहणीमान व बहुसंख्यांकांचे राहणीमान यातील दरीचे वर्णन करणारी संज्ञा कोणती ?

(A) लादलेले दारिद्र्य

(B) दारिद्र्याची संस्कृती

(C) तौलनिक दारिद्र्य

(D) निरपेक्ष दारिद्र्य

76. 'भारतीय कृषक अर्थव्यवस्थेचे स्वरूप व गतितत्त्व त्याची सांगड साम्राज्यवादाशी घातल्याशिवाय समजू शकत नाही,' असे प्रतिपादन कोणी केले ?

(A) एच. अलावी व आय. बानाजी

(B) के. मार्क्स व एफ्. एंगल्स

(C) एम. एन. श्रीनिवास

(D) ए. बेतेई

77. What is the researcher's relationship to the respondent in post-structuralism ?

(A) Equal

(B) Superior

(C) Inferior

(D) Equal and dialogical

77. उत्तर-संरचनावादात संशोधकाचे प्रतिसादाशी नाते कसे असते ?

(A) समान

(B) वरिष्ठ

(C) कनिष्ठ

(D) समान व संवादी

78. In which report the United Nations introduced the term 'Sustainable Development' first time ?

(A) Report on Human Rights

(B) The Limits to Growth

(C) Our Common Future

(D) Human Development Report

78. संयुक्त राष्ट्रसंघाने आपल्या कोणत्या अहवालात सर्वप्रथम 'शाश्वत विकास' ही संज्ञा आणली ?

(A) रिपोर्ट ऑन ह्यूमन राईट्स

(B) द लिमिट्स टू ग्रोथ

(C) अवर कॉमन फ्युचर

(D) ह्यूमन डेव्हलपमेंट रिपोर्ट

79. Empirical research is not research based on ..................... .

(A) Evidence collected by systematic observations from the field

(B) Ideas generated through theorizing and conjecture

(C) Studies that are realistic and relevant to the social world

(D) On site database gathered by the researcher

79. अनुभवाधिष्ठीत संशोधन हे .................. वर आधारित संशोधन **नाही**.

(A) व्यवस्थित क्षेत्रीय निरीक्षणाच्या आधारे संकलित केलेल्या तथ्यांवर

(B) सैद्धांतीकरण व अनुमानातून आलेल्या विचारांवर

(C) सामाजिक विश्वाच्या वास्तविक व सुसंगत अभ्यासावर

(D) घटनास्थळावरून संशोधकाने संकलित केलेल्या तथ्यांवर

80. Which of the following is a characteristic of qualitative research ?

(A) Objective

(B) Cause-effect linkages

(C) Value-free

(D) Subjective

81. Which of the following is a measure of central tendency ?

(A) Mode

(B) Range

(C) Standard deviation

(D) Codification

82. Ethnography implies .................. .

(A) People are meaning makers

(B) Objective study

(C) Research on people

(D) Sociometry is the study tool

80. खालीलपैकी कोणते गुणात्मक संशोधनाचे वैशिष्ट्य आहे ?

(A) वस्तुनिष्ठ

(B) कार्यकारण संबंध

(C) मूल्यविहीन

(D) व्यक्तिनिष्ठ

81. खालीलपैकी कोणता केंद्रीय प्रवृत्तीचा मानदंड आहे ?

(A) बहुलक

(B) व्याप्ती

(C) प्रमाण विचलन

(D) संकेतीकरण

82. लोकालेख .................. सूचित करतो.

(A) लोक अर्थान्वय करतात

(B) वस्तुनिष्ठ अभ्यास

(C) लोकांवर संशोधन

(D) समाजमिती हे अभ्यासाचे साधन आहे

83. Match List I with the List II and mark the *correct* answer from the codes given below :

**List I**

(*a*) Central tendency

(*b*) Dispersion

(*c*) Correlation

(*d*) Test of significance

**List II**

(1) Mean deviation

(2) Pearson's coefficient

(3) Median

(4) '*t*'-test

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (1) | (2) | (4) | (3) |
| (B) | (2) | (3) | (4) | (1) |
| (C) | (3) | (1) | (2) | (4) |
| (D) | (3) | (4) | (2) | (1) |

83. यादी I मधील मुद्द्यांना यादी II मधील मुद्द्यांशी जोडून दिलेल्या योग्य उत्तरांच्या संकेतांक पर्यायांची निवड करा :

**यादी I**

(*a*) मध्य प्रवृत्ती

(*b*) अपस्करण

(*c*) सहसंबंध

(*d*) यथार्थतेची चाचणी

**यादी II**

(1) मध्य विचलन

(2) पिअर्सन्सचा गुणांक

(3) मध्यांक

(4) 'टी'-टेस्ट

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (1) | (2) | (4) | (3) |
| (B) | (2) | (3) | (4) | (1) |
| (C) | (3) | (1) | (2) | (4) |
| (D) | (3) | (4) | (2) | (1) |

84. Which is the crucial feature of a good sample ?

(A) Small size

(B) Representativeness

(C) Easily approachable

(D) Easy to study

84. चांगल्या नमुन्याचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य काय आहे ?

(A) लहान आकार

(B) प्रातिनिधिकता

(C) संपर्क सुलभता

(D) अध्ययन सुलभता

85. The village Mendha Lekha in Maharashtra is known for its ............ .

(A) Strong local self government

(B) Tribal art

(C) Empowerment of women

(D) Agricultural development

85. महाराष्ट्रातील मेंढा लेखा हे खेडे ................ ओळखले जाते.

(A) सशक्त स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी

(B) आदिवासी कलेसाठी

(C) महिला सबलीकरणासाठी

(D) कृषी विकासासाठी

86. According to Toffler, the wake of the arrival of the third wave human social relations and the institutions are experiencing .................... .

(A) Consolidation in their social relations

(B) Disorientation in their social relations

(C) Consolidation of their primordial relations

(D) Consolidation of their secular relations

86. टॉफलरच्या मते, मानवी सामाजिक संबंध आणि संस्थांच्या तिसऱ्या लाटेच्या डगमाची सुरुवात ................... अनुभवते आहे.

(A) त्यांच्या सामाजिक संबंधांचे एकत्रीकरण

(B) त्यांच्या सामाजिक संबंधांची दिशाभूल

(C) त्यांच्या आदिम संबंधांचे एकत्रीकरण

(D) त्यांच्या ऐहिक संबंधांचे एकत्रीकरण

87. Which of the following is a New Social Movement ?

(A) The Backward Class Movement

(B) Peasants Movement

(C) Trade Union Movement

(D) LGBT Movement

88. Through social media false things are proven as reliable and true by the powerful sections. This is termed as :

(A) Media management

(B) Cyber manipulation

(C) Misrepresentation

(D) Misunderstanding

89. Information revolution led to the following change :

(A) Literary skills to mechanical skills

(B) Decentralization of work away from factories

(C) Predominance of manufacturing sector

(D) Fordist organization

87. खालीलपैकी कोणते एक नव सामाजिक आंदोलन आहे ?

(A) मागास वर्ग चळवळ

(B) शेतकरी चळवळ

(C) ट्रेड यूनियन चळवळ

(D) एल. जी. बी. टी. चळवळ

88. सत्ताधारी गटांकडून सामाजिक माध्यमांमार्फत खोट्या गोष्टी जेव्हा सत्य आणि विश्वसनीय म्हणून सिद्ध केल्या जातात तेव्हा त्याला .......... असे म्हणतात.

(A) माध्यम व्यवस्थापन

(B) सायबर हस्तलाघव

(C) गैरप्रतिनिधित्व

(D) गैरसमज

89. माहिती क्रांतीमुळे खालील बदल झाला :

(A) साक्षरता कौशल्ये ते यांत्रिक कौशल्ये

(B) कारखान्यांपासून दूर कामाचे विकेंद्रीकरण

(C) उत्पादन क्षेत्राचे प्राधान्य

(D) फोर्डिस्ट संघटना

90. Which of the following act of violence has yet not been formulated into a law ?

(A) Honour killing

(B) Domestic violence

(C) Sexual harassment at workplace

(D) Dowry practice

91. Given below are two statements, one is labelled as Assertion (A) and other as Reason (R).

**Assertion (A) :** Poor women are both victims of environmental degradation and active agents in environment protection movement.

**Reason (R) :** The women are more jeopardized than men.

Select the *correct* answer from the codes given below :

**Codes :**

(A) Both (A) and (R) are correct and (R) is correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) are correct, but (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true, but (R) is false

(D) (A) is false, but (R) is true

90. खालीलपैकी कोणती हिंसेची कृती अजून कायदा म्हणून पारित झाला नाही ?

(A) ऑनर किलिंग

(B) कौटुंबिक हिंसाचार

(C) कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळवणूक

(D) हुंडा प्रथा

91. खाली दोन विधाने दिली आहेत. एक प्रतिपादन (A) आहे आणि दुसरे कारण (R) आहे.

**प्रतिपादन (A) :** गरीब महिला, पर्यावरणीय ऱ्हासाच्या बळीही असतात आणि त्याचवेळी पर्यावरण संरक्षण चळवळीमध्ये सक्रीय कर्त्याही असतात.

**कारण (R) :** पुरुषांपेक्षा स्त्रियां अधिक धोकादायक परिस्थितीत असतात.

खालील संकेतांकामधून योग्य उत्तर निवडा :

**संकेतांक :**

(A) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत, आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे

(B) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत, परंतु (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही

(C) (A) बरोबर आहे पण (R) हे चूक आहे

(D) (A) चूक आहे पण (R) हे बरोबर आहे

92. Which one of the sustainable development goals deals with the climate change and its impact ?

(A) Goal No. 6

(B) Goal No. 8

(C) Goal No. 13

(D) Goal No. 15

93. Hindi movie 'Ki and Ka' is an example of which of the following concepts ?

(A) Androgyny

(B) Gender bending

(C) Gender roles

(D) Gender conflict

94. The 'new' about new religious movement is .................... .

(A) New religion

(B) New action style

(C) New leadership

(D) Alternatives to the mainstream religions

92. खालीलपैकी कोणते शाश्वत विकास ध्येय हे हवामान बदलांशी व त्याच्या परिणामांशी संबंधित आहे ?

(A) ध्येय क्र. 6

(B) ध्येय क्र. 8

(C) ध्येय क्र. 13

(D) ध्येय क्र. 15

93. हिंदी चित्रपट 'की आणि का' हा खालीलपैकी कोणत्या संकल्पनेचे उदाहरण आहे ?

(A) उभयलिंगता

(B) लिंगभाव वाकवणे

(C) लिंगभाव भूमिका

(D) लिंगभाव संघर्ष

94. नव्या धार्मिक चळवळीतील 'नवे' म्हणजे ...................

(A) नवा धर्म

(B) नवी कृतिशैली

(C) नवी नेतृत्वशैली

(D) मुख्य प्रवाही धर्मांना पर्याय

95. .................... refers to a combination of research methods adopted for studying social phenomena.

(A) Ethnography

(B) Triangulation

(C) Ethnomethodology

(D) Positivism

96. Interview is not a .................... .

(A) Simple two-way process

(B) Multilayered interpretation

(C) Complex tool

(D) Interpretation of silences and pauses

97. 'Broad, overall evaluation of what is knowledge and how it can be studied' is called ................. .

(A) Methodology

(B) Epistemology

(C) Positivism

(D) Ontology

95. सामाजिक घटनेचा अभ्यास करण्यासाठी स्वीकारलेल्या संशोधन पद्धतींच्या मिलाफाला .................. असे संबोधले जाते.

(A) लोकालेख

(B) त्रिकोणीकरण

(C) लोकपद्धतीशास्त्र

(D) प्रत्यक्षवाद

96. मुलाखत म्हणजे .................. नाही.

(A) सुलभ दुहेरी प्रक्रिया

(B) बहुपदरी अन्वयार्थ

(C) गुंतागुंतीचे साधन

(D) मौन व विरामांचा अन्वय

97. ज्ञान म्हणजे काय याचे व्यापक एकूण मूल्य-मापन व त्याचे अध्ययन कसे करायचे याला .................. असे म्हणतात.

(A) पद्धतीशास्त्र

(B) ज्ञानमीमांसाशास्त्र

(C) प्रत्यक्षवाद

(D) सत्ता मीमांसाशास्त्र

98. Positivism refers to ................ .

(A) Objectification

(B) Positive attitude to research

(C) An epistemological position privileging neutral, objective analysis

(D) Integrated analysis of data, theory

99. Research ethics aim at .................. .

(A) Efficiency in research

(B) Ethically sound decisions about research

(C) Justified research findings

(D) Reduction in research budget

100. Which of the following is *not* indicated by a survey ?

(A) Collection of data and information about people living in a specific area

(B) Undertaken for administrative as well as sociological purposes

(C) Collection of great deal of data about the lifestyles of people

(D) Used to study the dead and past society

98. प्रत्यक्षार्थवाद .................. सूचित करतो.

(A) वस्तुकरण

(B) संशोधनाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन

(C) तटस्थ, वस्तुनिष्ठ विश्लेषणाला महत्त्व देणारी ज्ञानमीमांसाशास्त्रीय भूमिका

(D) तथ्यसामग्री, सिद्धांत यांचे एकात्मिक विश्लेषण

99. संशोधनपर नीतिशास्त्रीय कल्पनांचे उद्दिष्ट .................. असे असते.

(A) संशोधनातील कार्यक्षमता

(B) संशोधनाविषयीचे नीतिशास्त्रीयदृष्ट्या सुयोग्य निर्णय

(C) संशोधनाचे असे निष्कर्ष ज्यांचे समर्थन मिळते

(D) संशोधनाच्या अर्थ संकल्पात कपात

100. सर्वेक्षणामधून खालीलपैकी कोणते विधान निर्देशित होत **नाही** ?

(A) विशिष्ट प्रदेशामध्ये राहणाऱ्या लोकांविषयीची माहिती आणि तथ्य संकलन

(B) प्रशासकीय तसेच समाजशास्त्रीय उद्देशासाठी अवलंब

(C) लोकांच्या जीवनशैलीविषयक महत्त्वपूर्ण तथ्यांचे संकलन

(D) गतकालीन आणि नष्ट झालेल्या समाजाच्या अध्ययनासाठी उपयुक्त

**ROUGH WORK**